# ३.स्वामी विवेकानंद आणि शिक्षण

व्यक्ती आयुष्य किती जगला यापेक्षा तो ते कसे जगला याला महत्त्व आहे. जीवनतत्त्वांचा अंगीकार करून जो आयुष्य जगतो, तो जीवनतत्त्वात विलीन झाल्यानंतरही तत्त्वरूपाने जगावर आपले अधिपत्य गाजवितो. त्याच्या आयुष्यातील प्रत्येक क्षण इतर अखिल मानवजातीकरिता मार्गदर्शक ठरतो. त्याचे सहजउद्‌गार हे वाक्प्रचार ठरतात. असे व्यक्तिमत्त्व ईश्वरीय रूप धारण करते. अशाच व्यक्तिमत्त्वाचे अधिकारी होते स्वामी विवेकानंद! श्रीरामकृष्ण परमहंस ह्यांच्यासारख्या सद्‌गुरूचा आशीर्वाद घेऊन, ही शुभशक्ती संपूर्ण जगभर परिभ्रमणास निघाली व आपल्या देदीप्यमान वाणीने संपूर्ण जग भारावून टाकले. सद्‌गुरूंचा संदेश संपूर्ण जगभर देऊन आदर्श शिष्याची भूमिका त्यांनी पार पाडली.

संपूर्ण जगभर परिभ्रमण करीत असताना त्यांनी भारताचे स्थान शोधण्याचा आटोकाट प्रयत्न केला. येथील लोकांची सुखदुःखं तपासून पाहिली, त्यांचे बहिरंग तपासून पाहिले पण ह्या बहिरंगावरून त्यांना खरा भारत गवसलाच नाही. बहिरंगावरून अंतरंगाची कल्पना येतच नाही. अंतरंग कळण्याकरिता सखोल बुडी मारावी लागते, तद्वतच त्यांनी भारताच्या अंतरंगात डोकावून पाहण्याचा प्रयत्न केला. आणि त्यांना भारताचा आत्मा गवसला. 'अध्यात्म' हाच भारताचा आत्मा आहे हे त्यांनी जाणले. हा आत्मा भारताच्या बहिरंगात नव्हता, इतिहासात नव्हता, गत वैभवात नव्हता, तर तो होता भारताच्या आध्यात्मिक शक्तीत.भारताचे पुनरुज्जीवन करायचे असेल,तर भारतीय तत्त्वज्ञान पुनरुज्जीवित करावे लागेल हे त्यांनी ओळखले. हे सर्व शिक्षणानेच साध्य होणारी बाब होती. पण त्यांना प्रचलित शिक्षणपद्धतीत अनेक दोष आढळून आले. त्यातील मुख्य दोष म्हणजे प्रचलित शिक्षणपद्धती ही भारताची अस्मिता नष्ट करणारी व लादलेली शिक्षणपद्धती होती. ''या शिक्षणपद्धतीतून भारताचा बाह्य विकास जरूर होईल पण भारताचे अंतरंग विकसित होणार नाही. हे अंतरंग विकसित करण्याकरिता भारतीय शिक्षणाचा पाया अध्यात्मच असावयास हवा.'' देशाच्या भौतिक विकासासोबतच लोकही भौतिकवादी बनतात. परिणामी, नैतिक व आध्यात्मिक मूल्यांचा ऱ्हास होतो, व देशाचे अधःपतन होते ही बाब स्वामीजींनी हेरली. अशा शिक्षणपद्धतीचा त्यांनी धिक्कार केला व स्पष्ट शब्दात इशारा दिला की, ''ब्रिटिशांचे शिक्षण हे माणूस घडविणारे नाही, ते अभावात्मक आहे. या शिक्षणाची पाळेमुळे आपल्या संस्कृतीशी कोठेच संवाद करीत नाही.'' विवेकानंदांना अपेक्षित होते ते माणूस घडविणारे शिक्षण, भारतीय संस्कृतीशी नाते सांगणारे शिक्षण, स्वधर्माची परिभाषा शिकविणारे शिक्षण.

स्वामी विवेकानंद यांच्या शिक्षणविषयक विचारांचे परिशीलन केल्यास एक बाब

लक्षात येते की, त्यांनी दोन दृष्टिकोनातून शिक्षणाचा विचार केला आहे. (१) आध्यात्मिक दृष्टिकोन व (२) व्यावहारिक दृष्टिकोन.

आध्यात्मिक दृष्टिकोनातून स्वामीजी इंद्रियगोचर ज्ञानाच्या पलीकडे जाऊन सूक्ष्म स्तरावर चर्चा करतात, तर व्यावहारिक दृष्टिकोनातून शिक्षणाची दैनंदिन जीवनाशी सांगड कशी घालता येईल याचा विचार करतात.

**आध्यात्मिक दृष्टिकोनातून शिक्षणाचा अर्थ :**

शिक्षणाची परिभाषा करताना स्वामीजी म्हणतात, ''शिक्षण म्हणजे व्यक्तीमध्ये जे पूर्णत्व आधीचेच विद्यमान आहे त्याचे प्रकटीकरण.'' प्रत्येक व्यक्तीमध्ये काही दैवी गुण असतात. पण हे गुण सुप्त स्वरूपात वास करीत असतात. हे चित्‌तत्त्व कर्म, भक्तियोग यांच्या माध्यमातून पूर्णत्वास जाते. स्वामी विवेकानंदांच्या मते, ''प्रत्येक व्यक्तीजवळ पूर्ण ज्ञान आहे, पण त्यावरील अज्ञानाच्या आवरणाने आवृत्त आहे म्हणूनच आत्म्याला अनावृत्त करणे म्हणजे शिक्षण. वटवृक्षाच्या बीजात संपूर्ण वटवृक्ष असतो. कमळाच्या छोट्या अंकुरात विकसित सुवासिक कमळ दडलेले असते, ते कमळपुष्प बाहेर पडले म्हणजे आपल्याला त्याचा प्रत्यय येतो. तद्वतच ज्ञानाची निर्मिती होत नाही, तर ते फक्त प्रगट होते.''

शिक्षणात धर्मालाही प्राधान्य देताना स्वामी म्हणतात, 'धर्म हाच शिक्षणाचा पाया आहे.' आज सर्वदूर धर्म हा शब्द अतिशय संकुचित स्वरूपात स्वीकारला जात आहे. धर्माची ज्ञानात्मक व आचरणात्मक बाजू दुर्लक्षिली जात आहे. स्वामीजी म्हणतात, ''धर्म म्हणजे आध्यात्मिकता! धर्म म्हणजे माणसामाणसांमधील आध्यात्मिक व दैवी शक्तीची अभिव्यक्ती.'' थोडक्यात आध्यात्मिकता हाच माणसाचा धर्म. ही आध्यात्मिकता जोपासण्यासाठी 'अहं ब्रह्मास्मि' हा भाव मनात दृढ करावा लागेल. राष्ट्राच्या दृष्टिकोनातून विचार केल्यास प्रत्येक राष्ट्राचा आत्मा असतो व त्यावरच राष्ट्राच्या तत्त्वज्ञानाची, संस्कृतीची जोपासना होत असते. भारताचा आत्मा कोणता हे सांगताना ते म्हणतात, ''ह्या पवित्र मायभूमीच्या जीवनाचा पाया व कणा एकमेव धर्म हाच आहे.''

**व्यावहारिक पातळीवरून शिक्षणाचा अर्थ :**

व्यावहारिक पातळीवरून विचार करताना ते सवाल करतात, ''समस्या सोडविण्याचे सामर्थ्य शिक्षणात आहे काय? ज्या शिक्षणातून जीवनसंघर्षाला तोंड देण्याचे सामर्थ्य लोकांमध्ये निर्माण होत नाही, बंधुत्वाची भावना विकसित होत नाही, पौरुष व पराक्रमाची प्रेरणा मिळू शकत नाही, ते शिक्षण काय कामाचे? ज्या शिक्षणाने माणूस स्वतःच्या पायावर उभे राहू शकतो, तेच खरे शिक्षण.'' शिक्षणातून चारित्र्यनिर्मिती व्हावी, हाच त्यांचा संदेश होता.

शिक्षणाचा अर्थ सांगताना ते म्हणतात,''शिक्षण म्हणजे जीवनाची घडण, माणुसकीचा विकास, चारित्र्यसंवर्धन व संकल्पनांचे आत्मीकरण. याकरिता सद्‌विचारांचे संस्कार मनावर होत गेले पाहिजे.'' शिक्षण हे पुस्तकी असूच शकत नाही. विविध ज्ञानशाखांमधील माहिती गोळा करणे म्हणजे शिक्षण नव्हे. व्यक्तीच्या विचारांचा, इच्छांचा आविष्कार ज्यायोगे नियंत्रित होईल व दैनंदिन जीवनात फलदायी होईल, त्यालाच विवेकानंद खरे शिक्षण म्हणतात. ''उच्च शिक्षणाचा खरा उपयोग जीवनातील समस्या सोडविता येण्यात आहे. याचाच अर्थ माहिती मिळविणे म्हणजे शिक्षण नसून

उपयोजनात्मक ज्ञानाची प्राप्ती हेच शिक्षण होय.''

**शिक्षणाची उद्दिष्टे :**

शिक्षणाचा अर्थ सांगितल्यावर स्वामीजींनी शिक्षणाची उद्दिष्टे दोन्ही पातळीनुसार स्पष्ट केली आहेत.

**आध्यात्मिक पातळीवरून शिक्षणाची उद्दिष्टे**

**स्वस्वरूपाची ओळख :**

आध्यात्मिक स्तरावर मनुष्यजीवनाचा मूळ उद्देश स्वस्वरूपाची ओळख हा आहे. स्वस्वरूप जाणणे यालाच स्वामीजी आत्मसाक्षात्काराचे ध्येय म्हणतात. हे ध्येय साध्य होण्याकरिता अंतःप्रेरणेची आवश्यकता आहे. अंतःप्रेरणा प्राप्त झालेला मनुष्य हा त्याचे पूर्णत्व आविष्कृत करीत असतो. अशी अंतःप्रेरणा प्राप्त झालेला मनुष्य निर्माण करणे हेच शिक्षणाचे अंतिम ध्येय आहे. याबाबत विवेकानंद म्हणतात, ''बुद्धी जेव्हा नानाविध विषय ग्रहण करून सामान्य निष्कर्ष काढते, तेव्हा तिला तर्कबुद्धी म्हणतात. हिच्यापेक्षा उच्च असे ज्ञानलाभाचे साधन आहे त्याला अंतःस्फूर्ती म्हणतात. तिच्यामुळे हृदयात एकाएकी ज्ञान प्रगट होत असते. अंतःस्फूर्ती हे तर्कबुद्धीचे विकसित रूप होय.'' अंतःस्फूर्तीने खऱ्या ज्ञानाची प्राप्ती होते. अज्ञानाचे पटल दूर होते. दैवी शक्तीचा आविष्कार होतो.

**व्यावहारिक पातळीवरून शिक्षणाची उद्दिष्टे :**

तत्कालीन शिक्षण पद्धतीचा विचार केल्यास शिक्षण पद्धती अभावात्मक होती. त्यात प्रत्यक्ष जीवन व शिक्षण यांच्यात कोठेच मेळ बसत नव्हता. स्वामी विवेकानंदांना जीवन व शिक्षणाचे असे तुकडे पाडणे मंजूर नव्हते. कारण जीवन हे तत्त्व आहे. 'शिक्षणाने जीवन समृद्ध झाले पाहिजे व जीवनाने शिक्षण सार्थकी लागले पाहिजे.' सत्याचा अर्थ कळला पाहिजे. याकरिता ते मार्ग सुचवितात – श्रमप्रतिष्ठेचा, स्वावलंबनाचा. प्रत्येकाने स्वावलंबी व्हावे म्हणून विद्यार्थ्याला त्याच्या कर्मेंद्रियांचा योग्य उपयोग करावयास शिकविले पाहिजे. या सर्वांची त्याच्या बुद्धिमत्तेशी सांगड घालावयास हवी.

**लोकशिक्षण :**

'आपले राष्ट्र आज झोपडीत राहात आहे. झोपडीत राहणाऱ्या बांधवांना आपल्या खऱ्या व्यक्तिमत्त्वाचा विसर पडला आहे. ह्या लोकांना शिक्षित करणे हाच त्यांच्या उद्धाराचा एकमेव मार्ग आहे. निरक्षरांना केवळ साक्षर करून चालणार नाही, तर भारतीय संस्कृतीशी, परंपरांशी त्यांचा समन्वय घडवून आणावा लागेल. व्यक्तीला आध्यात्मिक व नैतिक मूल्ये सांगावी लागतील.' सर्वसामान्यांना शिक्षण देऊन त्यांना साक्षर, त्याचसोबत सुसंस्कृत बनविणे हा त्यांच्या शिक्षणप्रणालीचा महत्त्वाचा उद्देश होता.

**राष्ट्रीय एकात्मता व आंतरराष्ट्रीय सामंजस्य :**

विविधतेत एकात्मता हे भारतीय संस्कृतीचे वैशिष्ट्य आहे. आणि अशा प्रकारचा अनुभव येणे, हाच खरा व्यक्तिविकास होय. राष्ट्रीय एकात्मता प्राप्त करून घ्यायची असेल तर प्रथम अंतःप्रेरणेच्या उच्च स्तरावर प्रथम व्यक्तिविकास व्हावा लागेल. व्यक्तिविकास झाला की राष्ट्रीय एकात्मता आपोआप निर्माण होईल.

आंतरराष्ट्रीय सामंजस्य प्रस्थापित करण्याचा एक आगळावेगळा मार्ग म्हणजे,

'बाह्य जगावर विजय कसा मिळवावा हे भारताने इतर देशांकडून शिकावे व अंतरंगावर विजय कसा मिळवावा, हे इतर राष्ट्रांनी भारताकडून शिकावे. त्यायोगे जगात मानवतेची स्थापना होईल. मानवता ही भौतिकवादाच्या भपक्यात नसून ती चिरंतन आध्यात्मिक सत्यात आहे.' आंतरराष्ट्रीय सामंजस्यासोबतच वैयक्तिक एकात्मताही महत्त्वाची आहे. शिक्षणाच्या माध्यमातून 'हे विश्वचि माझे घर' ही भावना निर्माण व्हावयास हवी.

अशा रीतीने स्वामी विवेकानंद यांनी अध्यात्म व व्यवहार यांची सांगड घालण्याचा प्रयत्न केला आहे. याचा उद्देश हाच होता की एकीकडे धर्मनिष्ठ कर्मकांडाला जुमानणारी, विज्ञानाकडे पाठ फिरविणारी जनता, तर दुसरीकडे धर्म विसरलेली, पाश्चात्यांचे अंधानुकरण करणारी जनता यांचा समन्वय साधण्याचे महत्त्वाचे काम स्वामी विवेकानंद यांनी केले आहे.